सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.337 ठ. क्र....325
दि.29/12/16...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



रामवाडी दवाखान्यासमोरील चौकात म्हणजे रामवाडी व सेटलमेंट उमेदपूरकडे जाणा-या चौकास व एस.एल.बी. रिक्षा स्टॉप जवळ म्हणजे माजी महापौर विठ्ठल जाधव यांच्या घरासमोर **क्षत्रिय कुलवंत टकारी समाज आपले सहर्ष स्वागत करीत आहे** असे फलक आर.सी.सी.बांधकामाचा कमान बाधणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

संबंधित संस्था खर्च करणार असल्यामुळे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 332 ठ. क्र. 326
दि. 29/12/96 रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील इयत्ता ९ वी मध्ये शिकत असलेला चि. विनित भवानीप्रसाद फलमारी वय १३ राहणार दाजी पेठ सोलापूर हया मुलाला ब्लड कॅन्सरचा आजार झालेला असून, त्या उपचारकरता डॉक्टरांच्या मते अंदाजे ६ लाख खर्च अपेक्षित आहे. तरी सदर मुलाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यास जास्तीत जास्त आर्थिक मदत करण्यास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 333 ठ. क्र. 320
दि. 29/12/16 रोजी ठेवला गेलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३३३

सोलापूर शहरातील एम.ए.पानगल हायस्कूल समोरील रस्त्यास किंवा बेगम कमरुनिस्सा कारीगार गर्ल्स हायस्कूल समोरील रस्त्यास **पै. नईम अ. अजीज शेख मार्ग** असे नामकरण करणेस मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.334 ठ. क्र....328
दि.29/12/96....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. मडवळय्या इरय्या हिरेमठ रा. थोबडे माळा डोणगांव रोड सोलापूर यांचा मुलगा उदयकुमार मडवळय्या हिरेमठ वय २ महिने हया बालकाच्या ह्रदयास छिद्र असल्याने अश्विनी सहकारी रुग्णलयात उपचार चालू आहे. श्री. मडवळय्या हिरेमठ यांचे वडील श्री. इरय्या सिद्रामय्या हिरेमठ हे बंद पडलेल्या लक्ष्मी विष्णू मिलचे कामगार होते. उदयकुमार हिरेमठ या बालकाच्या ह्रदयाचे ऑपरेशन करणे अत्यंत आवश्यक आहे. व त्यासाठी फार मोठा खर्च येणार आहे. श्री. मडवळय्या हिरेमठ यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखिची असल्याने त्यांना सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त अर्थसहाय्य देण्यास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.महापौरांना अधिकार देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज336.ठ. क्र....329
दि.21.12.96....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहर व जिल्हयातील एच.आय.व्ही. संसर्गीत नागरिकांची संख्या जवळपास पंधरा हजार असून यांच्यासाठी नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पिपल्स् लिव्हींग वुईथ एच.आय.व्ही. ही संस्था एच.आय.व्ही. बाधितांना राहण्यासाठी व त्यांचे वैद्यकीय देखभालासाठी कार्य करीत असते.सदर संस्थेचे कार्य हे सामाजिक दृष्टया फार मोठे असून सदर कामकाजासाठी त्यांना सोलापूर महानगरपालिकेकडे असलेले समाजमंदिर, अभ्यासीका देणेस व त्यांच्या समाजकार्यास हातभार लावणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी सोलापूर महानगरपालिकेच्या नविन हैद्राबाद नाका देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३३५.ठ. क्र. 330
दि. २१/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३३७

सोलापूर शहरातील हिप्परगा तलावच्या डावा कालवा म्हणून ओळखल्या जाणा-या (आडवा नळ) विविध भागातून जात आहे. तो ब-याच वर्षापासून बंद असून या जागेवर ब-याच ठिकाणी झोपडया होऊन तेथे नागरिकांचा रहीवास सुरू झालेला आहे. सदरची जागा ही मा. महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाची आहे. यास्तव सदर जागेवर वसलेल्या झोपडपटट्री धारकांना ही सोलापूर महानगरपालिकेला लागू असलेली प्रधानमंत्री आवास योजना लागू करून सदर झोपडयांच्या ठिकाणी या माध्यमातून पक्के घरे बांधून देण्यास मान्यता देणे आणि या सदरची प्रधानमंत्री आवास योजना पाटबंधा-याच्या जागेवर झोपडपटट्री झाल्याने त्या रहिवाशां करिता ही राबवणेस मा.शासनाची मान्यता मिळणेकामी मा. शासनाकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३३८ ठ. क्र....339
दि.29/12/96....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री.हुसेनसाब बादशाह एकतारसाब मुजावर रा.२१६/१७ कलावती नगर एम.आय.डी.सी रोड, सोलापूर यांना कॅन्सरचा आजार झाला असून, सदर आजारावर आजपर्यंत त्यांच्याकडून मोठा खर्च झालेला आहे. त्यांची आर्थिक परिस्थीत अत्यंत गरीबाची असून त्यांना या असाध्य अशा आजारावर औषधोपचार करणेकामी सोलापूर महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अध्किार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ज.३३९. ठ. क्र....३३२
दि. २२/११/१६...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



राष्ट्रीय महामार्ग क्र. १३ जुना विजापूर नाका ते सोरेगांव जलशुध्दीकरण केंद्रापर्यंतच्या रस्त्यास **विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर महामार्ग** असे नामकरण करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.३४०..ठ. क्र...333
दि.29.12.16...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३४०

**मा.सुभाष डांगे,मा.जगदेवी नवले यांचा दि.१४-१२-२०१६ चा प्रस्ताव**-विजापूर रोडवरील कंबर तलाव पासून विजापूर रोडकडे जाताना आय.टी.आय. लगत रसुल हॉटेल जवळ जो चौक आहे त्या चौकास **माता सावित्रीबाई फुले चौक** असे नामकरण करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.389 ठ. क्र...338
दि.29.12.2015...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



विजापूर रोड राष्ट्रीय महामार्ग क्रं.१३ वरील जुना विजापूर नाका, कंबर तलाव येथील चौकास **राणी लक्ष्मीबाई चौक** असे नामकरण करण्यास व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका